**PG-Marathi, Year-2nd[L-6.5]Semester-III**

# एम.ए.भाग २

# MAR-601-MJ – मध्ययुगीन कालखंडातील साहित्यकृतींचा अभ्यास

उद्दिष्टे :

१)मध्ययुगीन साहित्य व साहित्याचे प्रकार समजावून देणे.
२) साहित्यकृतींकडे पाहण्याचा आस्वादात्मक दृष्टीकोन विकसित करणे.
३) साहित्य प्रतिभा व सर्जन यांचा सहसंबंध लक्षात घेणे.
४) विविध मध्ययुगीन साहित्यप्रकारांची वैशिष्टे, स्वरूप व साम्य-भेद समजावून देणे.
५) साहित्यप्रकारनिष्ठ समीक्षेचे स्वरुप समजावून देऊन व उपयोजन कौशल्य विकसित करणे.
६) साहित्यकृतीच्या अभ्यासाचे महत्त्व विशद करणे.

## अभ्यासक्रम

घटक १) १.१.संत नामदेवकृत श्री ज्ञानदेव चरित्र

१.२. दृष्टान्तपाठ

घटक २) २.१ मोरोपंतांची श्लोककेकावली

२.२. पानिपतची बखर

**विद्यापीठ ७० गुणांची परीक्षा**

प्रश्न क्रमांक १) दोन पैकी एका प्रश्नाचे उत्तर लिहा. (शब्द मर्यादा - ३०० शब्द) - गुण १५
प्रश्न क्रमांक २) दोन पैकी एका प्रश्नाचे उत्तर लिहा. (शब्द मर्यादा - ३०० शब्द) - गुण १५
प्रश्न क्रमांक ३) दोन पैकी एका प्रश्नाचे उत्तर लिहा. (शब्द मर्यादा - ३०० शब्द) - गुण १५
प्रश्न क्रमांक ४) दोन पैकी एका प्रश्नाचे उत्तर लिहा. (शब्द मर्यादा - ३०० शब्द) - गुण १५
प्रश्न क्रमांक ५) चार पैकी दोन टीपा लिहा. (शब्द मर्यादा - १०० शब्द) - गुण १०

**अंतर्गत मूल्यमापन (एकण गण : ३० गुण )**

१) लेखी परीक्षा – २० गुण

२) मौखिक परीक्षा / प्रकल्पलेखन / गृहपाठ यापैकी १ पर्याय निवडा – १० गुण

## घटक १) १.१.संत नामदेवकृत श्री ज्ञानदेव चरित्र

**संत नामदेव -**

सगुण भक्तीत रमून, समाजाला मानवतेची उपासना शिकवून, भागवतधर्माची पताका पंढरीपासून पंजाबपर्यंत नेणाऱ्या नामदेवांचे व्यक्तिमत्त्व भाववेडे असे आहे. आपल्या अभंगवाणीच्या रूपाने त्यांनी वाचकांशी सख्यत्व जोडले. त्यांची अभंगवाणी म्हणजे त्यांच्या भाववेड्या, उदात्त, प्रसन्न, सोज्वळ आणि निष्पाप अशा व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होय. नामदेवांच्या नावावर आज **सुमारे अडीच हजार अभंग** जरी आढळत असले, तरी त्यात बरीचशी प्रक्षिप्तताही आहे. त्यांच्या स्थळकालाविषयीच्या माहितीतही बरीचशी विवाद्यता आढळते.

**जन्मस्थल व काल**

माझे जन्मपत्र बाबाजी ब्राह्मणें । लिहिले त्याची खूण सारू ऐका' या नामदेवांच्या अभंगाच्या आधारे रविवार, कार्तिक शुद्ध एकादशी श. ११९२ (इ. स. १२७०) या दिवशी नामदेवांचा जन्म झाला, असे स्पष्ट होते. हा अभंग संशयित नसल्यास नामदेव व ज्ञानदेव हे समकालीन ठरतात, असे शं. गो. तुळपुळे यांचे म्हणणे आहे. पण कै. भारदेबुवा यांनी इ.स. १८९८ त 'सुधारका' तून नामदेव हे उत्तरकालीन होत, असे मत मांडले. या शिवाय डॉ. भांडारकर, वा. ब. पटवर्धनही याच मताचे आहेत. पण कै. भिंगारकरांनी अनेक प्रमाणांसह नामदेव व ज्ञानदेव हे समकालीन होत, हे सिद्ध केले आहे. ए.ए. मॅक्डोनल, ईश्वरीप्रसाद, जे.सी. पॉवेल आदि इतिहासकारही नामदेवांचे जन्मवर्ष इ.स. १२७० (श. ११९२) हेच मानतात. मराठीतही रा. द. रानडे, ल. रा. पांगारकर, तुळपुळे आदींनी इ. स. १२७० ते इ. स. १३५० (श. ११९२ ते १२७२) हा नामदेवांचा कालखंड म्हणून मान्य केला आहे.

नामदेवांच्या जन्मस्थानाबद्दलही असाच वाद आहे. सुप्रसिद्ध संतचरित्रकार महीपती आणि अनंतदास यांच्या ग्रंथांत नामदेवांचे जन्मस्थान पंढरपूर असे दिले आहे. हे. वि. इनामदारांनीही नामदेवांचा जन्म पंढरपूरला झाला असे प्रतिपादन जनाबाईच्या अभंगाधारे केले आहे आपल्या आत्मचरित्रात स्वतः नामदेवांनीच 'नरसी ब्राह्मणीचा दामाशेट शिंपी' असा उल्लेख केला आहे. त्यामुळे पंढरपूरऐवजी नामदेवांचा जन्म नरसी-बामणी येथेच झाला असावा हे स्पष्ट. बामणी ही गावे नेमकी कुठे आहेत, याबद्दल मात्र बराच वाद आहे, होते.

**नामयाची वाणी**

आज नामदेवांच्या नावावर सुमारे अडीच हजार अभंग आढळतात. ' शतकोटी तुझे करीन अभंग' ही त्यांची प्रतिज्ञा होती, असे त्यांच्या गाथेतील उल्लेख सांगतात. 'वाल्मिकीने शतकोटी रामायण रचले त्याच धर्तीवर शतकोटी अभंग रचण्याची कल्पना नामदेवांना सुचली असावी;' असे कै. सोनोपंत दांडेकरांचे मत

आहे. पण आज नामदेवांचे अडीच हजारच अभंग उपलब्ध आहेत, एवढे मात्र खरे. रामदास-तुकारामांप्रमाणे जरी त्यांची काव्यदृष्टी पूर्णपणे जागृत नसली, तरी त्यांच्या अंतर्मुखतेतून आणि आत्मविस्मृतीतून जे काव्य जन्मले, ते अत्यंत उत्कट असे आहे. शं. गो. तुळपुळे' म्हणतात, नामदेवांची काव्यविषयक आत्मविस्मृती काही अपूर्व आहे. काव्यदृष्टी किंवा काव्यध्येय असे त्यांना नाहीच. एकमेकास हिताच्या गोष्टी सांगून सावध करावे, विश्वाचे शोक मोह निरसावे, हरिनामाचा महिमा गावा, भक्ती वाढवावी आणि हरिदासांना आकल्प आयुष्य व संतमंडळीस सुख चिंतावे यापरता अन्य हेतू मनात ठेऊन नामदेवांनी ग्रंथरचना केलेली नाही. नामदेवांच्या अंतरंगाचे अत्यंत स्वच्छ व नितळ प्रतिबिंब आपणांस या अभंगवाणीत पहावयास मिळते आणि 'नामयाची वाणी अमृत्ताची खाणी' या विधानाची सत्यता पटते.

**आत्मचरित्रात्मक अभंग :-**

नामदेवांनी आत्मचरित्रपर असे ४९१ अभंग लिहिले आहेत. लौकिक आणि पारमार्थिक संघर्षातील नामदेवांच्या मनाचे आणि जीवितातील प्रसंगांचे चित्रण त्यात आढळते. एका अर्थाने नामदेवांचे हे आत्मचरित्रच होय. नामदेवांच्या जीवनातील आध्यात्मिक अंतरंगाचे दर्शन त्यातून घडते.

**ज्ञानेश्वरचरित्र**

मराठीतील पहिले चरित्रकार म्हणून महानुभावीय ग्रंथकार म्हाइंभट्ट यांचा उल्लेख केला जातो. पण त्यांनी लिहिलेली चरित्रे गद्यात आहेत. (काव्याच्या माध्यमातून पहिले चरित्र लिहिण्याचा मान नामदेवांकडे जातो. **आदि, समाधी आणि तीर्थावळी** अशा तीन प्रकरणांतून त्यांनी आपल्या परमप्रिय सुहृदाचे म्हणजे ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहिले असून त्यांतील एकूण **अभंगसंख्या सुमारे साडेतीनशे** आहे. तीर्थावळी आणि समाधी ही दोन प्रकरणे नामदेवांनी अगोदर लिहिली असून, चरित्राला पूर्णता यावी म्हणून 'आदि' हे प्रकरण नंतर लिहून जोडले असावे. 'तीर्थावळी' व 'समाधी' या प्रकरणांत ज्ञानदेवांचे चरित्र सांगता सांगता नामदेवांचे आत्मचरित्रही अगदी सहजपणे उतरले आहे. नामदेव ज्ञानदेवांशी किती समरस झाले होते, याची ही साक्षच म्हटली पाहिजे. नामदेवांना ज्ञानदेवांविषयी वाटणारा आदर व प्रीती या अभंगांतून व्यक्त होते.

**आदि, तीर्थावळी व समाधी नामदेव रचित ज्ञानेश्वर चरित्रपर तीन प्रकरणे.**

'आदि' प्रकरणात (३० अभंग) ज्ञानेश्वरांच्या मातापित्यांची माहिती दिली आहे. 'तीर्थावळी'मध्ये (५६ अभंग) ज्ञानेश्वर-नामदेवांच्या उत्तर यात्रेचे वर्णन आहे. 'समाधी' प्रकरणात (२६६ अभंग) निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई या चार भावंडांच्या बरोबरीने चांगदेव यांच्या समाधीचे वर्णन आहे. ही तिन्ही नामदेवांची आहेत की उत्तरकालीन कवींनी रचलेली आहेत याबाबत वारकरी संप्रदायाच्या अभ्यासकांमध्ये मतभिन्नता आढळते. तथापि, ही प्रकरणे ज्ञानेश्वरांच्या चरित्राच्या उपलब्ध साधनांपैकी आद्य व महत्त्वपूर्ण

मानली जातात. महीपती, निरंजनमाधव या अकराव्या शतकातील ज्ञानेश्वरांच्या चरित्रकारांनी या प्रकरणांच्या आधारेच आपली ज्ञानेश्वरचरित्रे सिद्ध केली आहेत.

**आदि प्रकरणात** 'संन्याशाची मुले' म्हणून लोकांनी या भावंडांची केलेली हेटाळणी व त्यामुळे ज्ञानदेवांना झालेल्या मनस्तापाचे चित्र आले आहे. निवृत्तिनाथ, ज्ञानदेव व सोपानदेव या भावंडांचे 'तिन्ही देव जैसे परब्रम्हीचे ठसे। जगी सूर्य जैसे प्रकाशले' असे वर्णन करून या अभंगात ज्ञानदेवांच्या साऱ्या जीवनकर्तृत्वाचा धावता आलेख नामदेव काढतात.

तिन्ही देव जैसे परब्रम्हीचे ठसे। जगीं सूर्य जैसे प्रकाशले ॥१॥
धन्य तो निवृत्ती धन्य तो सोपान। धन्य तो निधान ज्ञानदेव ।।२।।
उपजतांचि ज्ञानी हे वर्म जाणोनी। आले लोटांगणीं चांगदेव ॥३॥
प्रत्यक्ष पैठर्णी भर्ती केला वाद। बोलविला वेद म्हैशीपुत्रा ॥४॥
सोहं सुकृताच्या सोडोनिया गांठी। केलीसे मराठी गीतादेवी ।।५।।
नामा म्हणे सर्व सुकृत लाहिजे। एक वेळा जाईजे अळंकावती ।।६।।

**"तीर्थावळी 'त** ज्ञानदेवांसोबत नामदेवांनी केलेल्या तीर्थयात्रेची हकीकत आहे. यात्रेत विठ्ठलापासून लांब आलेल्या नामयाच्या मनःस्थितीचे येथील चित्र मोठे सुरेख आहे. विठ्ठलवियोगामुळे नामयाची झालेली कासाविसी त्यात विशेषकरून दिसते. ज्ञानदेव आणि नामदेव यांच्या तीर्थावळीतील संवादात भक्तियोगाचे सार आले आहे. त्याहीपेक्षा मनाला स्पर्श करून जाते ती ज्ञानदेव आणि नामदेव यांची सुहृदगाथा. जी भावभक्ती नामदेव अनुभवतात ती समजून घेण्यासाठी ज्ञानदेव नामदेवांची 'पंढरीरायाचा तू प्रेमभांडारी। आशा पूर्ण करी मज याचकाची' अशा शब्दात विनवणी करतात. 'भक्त भागवत बहुसाल ऐकिले। बहु होऊनी गेले होती पुढे ।। परी नामयाचे बोलणे नव्हे हे कवित्व । हा रस अद्‌भुत निरूपम ।।' हे नामदेवांचे त्यांनी केलेले कौतुक भावोत्कट असे आहे.

**'समाधी' हे प्रकरण** तर करुण रसाचा परमोत्कर्षच आहे. ज्ञानदेवांसारखा जीवीचा जिवलग समाधी घेत असताना प्रत्यक्ष पाहिलेला प्रसंग नामदेवांसारख्या भावप्रधान कवीने वर्णन केल्यामुळे हृदयस्पर्शी झाला आहे. ज्ञानदेवांच्या समाधीप्रसंगी' बांधल्या तळयाचा फुटलासे पाट। ओघ बारा वाट मुरडताती' ही निवृत्तिनाथांची अवस्था आणि 'हरिणीवीण खोपी पडियेली वोस । दशदिशा पाडस भ्रमताती' ही इतर भावंडांची व्याकुळता येथे अत्यंत उत्कटपणे व्यक्त झाली आहे. नामदेवांचे नामयाची वाणी अमृताची खाणी साधेच शब्द पण येथे विलक्षण वेधक बनतात. अशा करुणरम्य आणि भावोत्कट स्थितीत 'काय सांगो देवा ज्ञानोबाची ख्याती। वेद म्हैशामुखी बोलविले' असे जेव्हा नामदेव ज्ञानदेवाचे कौतुक करतात तेव्हा त्यांच्या वाणीला कौतुकासोबतच कारुण्याचीही किनार लाभते. हे निवेदन करीत असताना

कासावीस प्राण मन तळमळी। जैसी कां मासोळी जीवनाविण ।।

दाही दिशा वोस वाटती उदास । करिताती सोस मनामार्जी ।।
घातियेली घोण प्राण आला कंठीं। ज्ञानदेवासाठी तळमळी ।।
नामा म्हणे देवा वाटतसे खंती। चालली विभूती योगियांची ।।
कोण जाणे माझे जीवींचा कळवळा । प्रेमाश्रु डोळां लोटताती ।।
नामा म्हणे येथे बोलवेना मज। जातसे निजगुज आवडीचे ।।

अशी खुद्द नामदेवांची स्थिती झाली आहे. जिवंत अनुभूती आणि भावमधुर शैली यांचा संगम या प्रकरणात झाला आहे. चरित्रकार आणि चरित्रविषय हे येथे केवळ परस्परानुरूपच नव्हे, तर एकरूप होऊन गेल्यामुळे नामदेवांचे हे प्रकरण काव्य दृष्टचाही मोठे रख्य उतरले आहे, 'हृदयाहृदय एक व्हावे' त्याप्रमाणे येथे नामदेव आणि ज्ञानदेव यांची हृदये एकवटली आहेत. इतक्या आत्मीयतेने लिहिलेले चरित्र मराठी भाषेत दुसरे नसेल.

**सारांश :-**

मराठीतील पहिले भावकवी, पद्य चरित्रकार, आत्मचरित्रकार, आख्यानकवी, भागवतधर्माचे पहिले संघटक आणि प्रचारक, कीर्तनपरंपरेचे प्रवर्तक, आपल्या शिष्याची समाधी बांधणारे गुरू अशा अनेक दृष्टींनी नामदेवांचे व्यक्तिमत्त्व संपन्न आहे. समाजमनस्क अशा नामदेवांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला आकार दिला नामदेवांच्या संदर्भात हे. वि. इनामदार म्हणतात, नामदेव हे थोर भक्त होते. तसेच ते कुशल संघटकही होते. वारकरी संप्रदायाच्या संघटनेचे कार्य त्यांनी ज्ञानेश्वरांच्या हयातीत तर केलेच, पण ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतरही पन्नास वर्षे महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर नामदेवांनी विठ्ठलभक्तीचा ध्वज फडकविला. विविध प्रदेशांत जाऊन नामदेवांनी तेथील लोकभाषांत रचना केली, अठरापगड जातींना विठ्ठलप्रेमाने भारून जातिनिरपेक्ष अशा अध्यात्मविचारांची मुहूर्तमेढ रोविली. नामसंकीर्तनाची नवी परंपरा सुरू केली आणि वारकरी संप्रदाय हा अतिशय प्रभावशाली बनविला. संतांची अभंगवाणी ही उत्कृष्ट भावकविता आहे, याची पहिली प्रचीती नामदेवांच्या अभंगवाणीतून येते.

---------------------------------------------------------------------

## १.२. दृष्टान्तपाठ

ज्ञानेश्वरांच्या काही काळ आधी 'महानुभाव' संप्रदाय महाराष्ट्रात उदयास आला.आणी मराठी भाषेचा आद्य मराठी ग्रंथ लीळाचरित्र लिहिला गेला"महान अनुभवोस्तेजा बलं वा यस्य सः महानुभावः" या दृष्टीने मोठा तेजाने युक्त असलेल्या लोकांचा मार्ग, तो महानुभाव पंथ, असे म्हणले जाते. समाजात चातुर्वर्ण्याची मिरासदारी वाढलेली असण्याच्या काळात सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी वैदिक तत्त्वज्ञानाला बाजूला करून, ज्ञान आणि भक्ती यांचा समन्वय करून आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार केला आणि सर्वच देवतांचे प्रस्थ कमी केले. देवतांच्या पूजेचा निषेध केला आणि चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर हल्ला चढविला. आपल्या पंथात त्यांनी स्त्रिया, शूद्र, सकलजाती, बहुजन सर्वांनाच दीक्षा घेण्याची सोय ठेवली. संपूर्ण अहिंसा आणि कडकडीत वैराग्य यांचे पालन आपल्या संप्रदायात अपरिहार्य मानले. धर्माचे रहस्य आपल्या बोलीभाषेत सांगणाऱ्या बौद्ध आणि जैन संप्रदायांप्रमाणो जनभाषेत आपले तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला. श्री चक्रधरस्वामी आणि पुढे इतर संतांनी केलेला लोकभाषेचा पुरस्कार हे या काळातील एक मोठे सांस्कृतिक कार्य होते.

**सर्व महानुभाव वाङ्मय पंथनिष्ठेवरच आधारलेले आहे. तीच त्यांची प्रेरणा आहे.** पंथाच्या प्रवर्तकांची चरित्रे, लीळा, वचने, आख्यायिका, पंथीय तत्त्वज्ञान आणि आचारधर्म यांचे जतन करणे, त्यांचे दर्शन घडविणे आणि त्यांचा प्रसार करणे ही त्यांची खरी भूमिका. गद्य आणि पद्य अशा दोन्ही माध्यमांतून त्याची जाणीवपूर्वक निर्मिती झाली आहे. संस्कृतात ग्रंथरचना करावी, हा शिष्टमान्य संकेत रूढ असण्याच्या या काळात चक्रधर व नागदेवाचार्य यांनी आपल्या ग्रंथकारांना कटाक्षाने मराठीतच ग्रंथरचना करण्यास सांगितले. 'आपल्या स्वामीचा सामान्यु परिवारु' नागविला जाऊ नये, काठिन्यता चुकवून त्याला परमेश्वरलाभाला वाव असावा म्हणून 'महाराष्ट्रीये निरुपिले कीं गा' असे त्यांनी स्पष्ट सांगितले. प्रथम ही ग्रंथरचना देवनागरीत झाली असली, तरी चक्रधरांनंतर सुमारे साठ-सत्तर वर्षांनी मात्र वाङ्मयगुण-रूपांनी संपन्न असलेले हे ग्रंथभांडार महानुभावप्रणीत सांकेतिक लिपीच्या पडद्याआड अदृश्य झाले. पण गेल्या शंभर-एक वर्षांपासून देवनागरी लिपीतून ते पुन्हा सर्वांपुढे आले आहे.

महानुभावांनी, आठवणी, दिनचर्या, स्थळवर्णन, व्यक्तिवर्णन, कथात्मक भावगीतसदृश, तात्त्विक व विवेचनपर अशी विविध प्रकारची रचना केली आहे. लीळाचरित्र, स्मृतिस्थळ, ऋद्धिपूरचरित्र, सिद्धान्तसूत्रपाठ, दृष्टांतपाठ व पूजावसर हे गद्यवाङ्मय एका धार्मिक प्रेरणेतून आल्याचे दिसते. या सर्व रचनेत चक्रधरांचे चरित्र व शिकवणूक हाच विषय प्राधान्याने आहे. बहुतेक गद्यग्रंथ संकलनात्मक आहेत.

## दृष्टांतपाठ (केशिराजबास, १२८०)

चक्रधरोक्त सूत्रपाठा 'चे संकलनकार केसोबास यांनी हा ग्रंथ संपादित केला आहे. दृष्टांतपाठ चक्रधरांनी तत्त्वस्पष्टीकरणासाठी वेळोवेळी सांगितलेले ११४ दृष्टांत लीळाचरित्रातून वेगळे काढून त्यावर दार्ष्टांतिकरूपाने केशिराजबास  यांनी सिद्ध केलेली टीका म्हणजेच हा ग्रंथ. चक्रधरोक्त तत्त्वज्ञानच येथे केसोबासांनी शास्त्रोक्त पद्धतीने मांडून दाखविले आहे. यामुळे 'दृष्टान्तपाठ' हे चक्रधरांच्या 'उद्धरणसिद्धान्तावरील जणू एक उपनिषदच' असल्याची जाणीव शं. गो. तुळपुळे करून देतात. आपले तत्त्वज्ञान सर्वसामान्यांना सुलभ करून सांगण्यासाठी चक्रधर अनेक दृष्टान्त देत. हे दृष्टान्त लोकजीवनातूनच निवडलेले असत. 'दृष्टान्तपाठा 'त अशा एकुण ११४ दृष्टान्तांचे संपादन झाले आहे. हे दृष्टान्त म्हणजे उपदेशपर कथाच म्हणावयास हरकत नाही.

केसोबासांनी चक्रधरोक्त सूत्रे व दृष्टान्त निवडले व त्या दृष्टान्तांतून सूचित केलेले तत्त्व दार्थांतिक या नावाने जोडले. प्रत्येक दृष्टान्ताचे तीन भाग पडतात. प्रथम श्रीचक्रधरोक्त सूत्र, नंतर त्या सूत्रातला विचार किंवा तत्त्व पटविणारा दृष्टान्त, आणि शेवटी त्या दृष्टान्तातून त्या सूत्राशी सुसंगत असे काढलेले पारमार्थिक निष्कर्ष, म्हणजे दाष्टातिक. 'दृष्टान्तपाठा 'तील सूत्रे व दृष्टान्त. चक्रधरांचे, आणि दाष्टांतिके केसोबासांची आहेत. सूत्रे व दृष्टान्त चक्रधरांच्या कालातील इ. स. १२७६ पर्यंतची (श. ११९८) आणि दार्ष्यातिके चक्रधरानंतर इ. स. १२८० (श. १२०२) च्या सुमारास केसोबासांनी लिहिलेली आहेत.

'सूत्रपाठ' हा पूर्णतया श्रीचक्रधरांच्या मुखातील वचनांचा ग्रंथ आहे. सूत्रांचे संकलन केशिराजव्यासांनी केले एवढेच. लीळाचरित्रामध्ये स्वामी सूत्रे सांगतात त्या सूत्रातील आशय समजावा म्हणून एखादा दृष्टांत सांगत असत. सूत्रपाठाप्रमाणेच दृष्टांतपाठाचेही संकलन केशिराजांनीच केले. मात्र दृष्टांतपाठ केवळ संकलनच नाही, तर प्रत्येक दृष्टांतावर त्यांनी आपले भाष्यही केले आहे. म्हणजे दृष्टांतपाठाचे कर्तृत्व दुहेरी आहे.

दृष्टांतपाठातील प्रत्येक दृष्टांत सूत्र, दृष्टांत व दाष्टर्शान्तिक अशा स्वरूपात मांडलेले आहे. आधी स्वामींचे सूत्र, त्यानंतर त्या सूत्राच्या अनुषंगाने येणारा दृष्टांत आणि नंतर सूत्र व दृष्टांत यांचा तात्त्विक संबंध जोडणारे दाष्ट्रन्तिक मात्र केशिराज व्यासांचे आहे. लीळाचरित्रात तर काही ठिकाणी फक्त दृष्टांताचाच उल्लेख येतो. पूर्ण स्वरूपात दृष्टांत येत नाही, असे केवळ उल्लेखिलेले दृष्टांतही केशिराजांनी पूर्ण केले आहेत. म्हणजे दृष्टांतपाठाची रचना ही संमिश्र स्वरूपाची आहे.

दृष्टांतपाठात एकूण ११४ दृष्टांत येतात. यातील प्रत्येक दृष्टांत आपापल्यापरीने अर्थपूर्ण आहे. ती छोटीशी एक बोधगर्भ कथाच आहे. स्वामींनी निरुपलेल्या प्रत्येक दृष्टांतामध्ये आपल्याला तत्कालीन समाजाचे दर्शन होते. अत्यंत साध्या, सरळ शब्दांत सांगितलेल्या कथांमुळे मूळ सूत्राचे बीज उकलण्यास मदत होते व त्यातून सूत्राचा उद्देश लक्षात येतो. केशिराजव्यासांनी हा सूत्राचा उद्देश दार्शन्तिकात अधिक

स्पष्ट करून दाखविला आहे. दृष्टांतात येणाऱ्या कथांमधील प्रतिमा या इतक्या समाजमान्य आहेत की त्यातील आशय लक्षात आल्यावर ती कथा आपल्याला आपल्या जीवनानुभवातील वाटते. लहान, आटोपशीर, अर्थपूर्ण वाक्यांमुळे तर त्यातील आशयघनता अधिक रोचक झालेली आहे. **उदाहरणादाखल, प्रेमाचा आस्वाद घेणे चांगले हे विशद करण्यासाठी चक्रधरांनी दिलेला हा 'साकरेचा दृष्टांत'**

सूत्र : 'साधनापसी साध्य उत्तम :'

दृष्टांत : 'साकर होइजे तें नीकें की साकर अनुभवीजे तें नीकें :'

दाष्टांतिक : 'तैसें ब्रह्म होइजे तें नीकें की ब्रह्म
अनुभवीजे तें नीकें :'

**'सेवाळलेया खडकाचा दृष्टान्त'**

**सूत्र :** राजसा तामसा धर्मी अधिकार नाही.

**दृष्टान्त :** सेंवाळले खडक असें : तयावरि पावो देउंची
तथा ठेउंचि नए। ऐसांही ठेवीजे तरि नीरसौनि पाडी :

**दार्थीतिक :** तैसे तामसाप्रति धर्म बोलोचि नए : ऐसांही बोलीजे तरि दुःखातेचि दे ।।
गुडघे कोपर झांजरीती ।।

मावोडेयाचा दृष्टांत

**सूत्र -** धड तुटलेयांही जीवें परमेश्वराते न सोडावे : वासना न संडावी

**दृष्टांत-** माकोडा असे : तो जीवन पाहे : जीवन सांपुडे आणि धरी : तो झाडीता झडेना :
तोडीता तुटेनाः ऐसाही झाडीजे तरिधड तुटे परिझडेना.

**दार्शन्तिक -** तैसे जीवाचे जीवन परमेश्वरू: शारीरे झाडावा नाः मानसिके तुटावा ना जीवन न
सोडावे

राजहंसाचा दृष्टांत

सूत्र - जीवासि सकळ संपत्ती परमेश्वरसंपत्ती

दृष्टांत - राजहंस असे : तो मानसरोवरावांचौनि न रमे : गावोगावी देशोदेशी नदोनदी
बावीपोखरणी असती परि तेथ न रमेः कां ते आदिवंते उदके म्हणौनि :

दाष्टर्शान्तिक - तैसे भक्त ईश्वरासुखावांचौनि आदिवंते आणि सुखे न सेवी

**समर्पक आणि मनाला भिडतील असे दृष्टान्त** आणि मार्मिक शब्दयोजना यांमुळे सूत्रातील उपदेश सामान्यांना सहज समजेल असा झाला आहे. 'चक्रधरांची जिवंत वाणी आणि केसोबासांची सुसंस्कारित भाषासरणी यांचा संयोग आपणास 'दृष्टान्तपाठा 'त आढळतो. या दृष्टान्तांतून स्कीनीवनातील विरह आणि प्रेम या भावनांचा आविष्कार तर झाला आहेच, पण यादवकालीन नागरी आणि ग्रामीण समाजजीवनाचेही दर्शन घडले आहे.

**दृष्टांतपाठात शब्दांच्या संपत्तीचे वैभव** वाखाणण्यासारखे आहे. स्वामींचा वावर समाजातील सर्वच थरांमध्ये असल्यामुळे त्यांच्या बोलण्यात अनेक प्रकाराचे शब्द आढळून येतात आणि म्हणूनच त्यातील शब्दसंग्रह समृद्ध आहे. काही शब्द पाहण्यासारखे आहेत. उदा. खणिकार (हिऱ्यांचे काम करणारा), बांदकरी (माणसे धरून त्यांची विक्री करणारा), वैद्य; पाथरवट (पाषाणाची परीक्षा करणारे), खाती (लोहार), गुळहारिया (रसापासून गुळ काढणारा), इत्यादी अनेक व्यावसायिक शब्द आहेत. सेजीयासाइलीया, आंगीटोपरे, गोरागोमटा, मोडीतोडी, सोएरीधाएरी असे अनेक जोडशब्दही पाहावयास मिळतात. ऐल-पैल, ऐलाडि-पैलाडि, रिगणे-निगणे, वोखटे- गोनटे, भरे-रिचवे, लांब-लहान, इत्यादी विरुद्धार्थी शब्दांची रेलचेल आहे.

**दृष्टांतपाठात वाक्प्रचार** तर सर्वत्र आहेत. गद्य ही व्यवहाराची भाषा असल्यामुळे वैविध्यपूर्ण वाक्प्रचार असणे साहजिकच आहे. पुढील काही वाक्प्रचार पाहण्यासारखे आहेत. आलेयापालेया पोट भरणे, खंति करणे, गहाण ठेवणे, घरवात करणे, जिव्हे कुष्ट लागणे, तोंड देणे, तोंड पळविणे, दारवंटी राखणे, पाठीसि घालणे, पान्हा येणे, इत्यादी.

**सारांश –**

चक्रधरांनी तत्त्वस्पष्टीकरणासाठी वेळोवेळी सांगितलेले ११४ दृष्टांत लीळाचरित्रातून वेगळे काढून त्यावर दार्ष्टांतिकरूपाने केशिराजबास यांनी सिद्ध केलेली टीका म्हणजेच हा ग्रंथ. सूत्र, दृष्टांत व दार्ष्टांतिक असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. सूत्राची भाषा शास्त्रीय, दृष्टांताची भाषा सामान्यांना समजेल अशी सुलभ, सुटसुटीत व दार्ष्टांतिकाची भाषा पंडिती. सूत्र व दृष्टांत यावर चक्रधरांच्या भाषेचा ठसा उमटला आहे तर दार्ष्टतिकाला केशिराजबास यांच्या भाषेचा डौल आहे. - एकाच ग्रंथात भाषेची ही तीन अपूर्व वळणे.

दृष्टांतपाठ हा केवळ तत्त्वज्ञानाचाच ग्रंथ नाही तर लोककथांचे ते पहिलेवाहिले संकलनही आहे. त्यामुळे त्याला मनोरंजकता लाभली आहे. खरे तर नागदेवाचार्यांनी सांगितलेल्या 'म्हातारिया' ना तो सोप्यात सोप्या भाषेतील अज्ञानमंचून करणारा ज्ञानग्रंथ आहे. तत्त्वज्ञान, समाजदर्शन, समर्पक दृष्टांत यांचा सुरेख मिलाफ व यादवकालीन मराठी गद्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून या ग्रंथाचा निर्देश करावा लागेल.

---

## घटक २) २.१ मोरोपंतांची क्षोककेकावली

मोरोपंत हे पंडिती परंपरेतील सर्वश्रेष्ठ आणि कालाच्या दृष्टीने शेवटचे कवी होत. 'नामदेवादिकांत आढळून येणारी परमेश्वराच्या कृपेविषयी तळमळ; नाथांच्या ठिकाणी दिसणारे गृहस्थाश्रमातील कर्तव्यपूर्तीचे समाधान; वामनादिकांचे पांडित्य; निरंजनमाधवादिकांचे रचनाचातुर्य; दासोपंतादिकांची प्रचंड लेखनशक्ती, यापूर्वीच्या कोणत्याही अनुवादकापेक्षा विशेष असा अपूर्व प्रामाणिकपणा, भगवच्चरित्रगायनांची महीपतीसारखी अमर्याद गोडी' अशी अनेकविध वैशिष्ट्ये पंतांच्या ठिकाणी एकत्रित झालेली आढळतात. मराठी राज्याचा विस्तार वाढत होता, रणधुमाळी चालू होती, मराठ्यांच्या कर्तबगारीची क्षेत्रे रुंदावली होती; श्रीधर, कृष्णदयार्णव, रमावल्लभदास, मध्वमुनीश्वर, अमृतराय हे कर्तृत्वसंपन्न कवी साहित्याच्या क्षितिजावरून अस्तंगत झाले होते, अशा काळात मोरोपंतांच्या काव्यलेखनास प्रारंभ झाला.

मोरोपंत मयूरकवी । मयूरपंडित । (१७२९ ते १७९४) कवी. संपूर्ण नाव मयूर ऊर्फ मोरेश्वर रायाजी पराडकर. मोरोपंतांचा जन्म इ. स. १७२९ (श. १६५१) मध्ये पन्हाळगडावर झाला. आईचे नाव लक्ष्मी. वडील कोल्हापूर दरबारी नोकर. वास्तव्य पन्हाळगड. बालपणही तेथेच गेले. प्रारंभीचे शिक्षण वडिलांच्या हाताखाली. त्यानंतर केशव व गणेश या वेदशास्त्रपारंगत पाध्येबंधुद्वयाकडे संस्कृत काव्य-नाटक-व्याकरण-अलंकारादी शिकून न्याय व ना वेदान्त यांचे अध्ययन. शिवाय विवेकसिंधु, ज्ञानेश्वरी, परमामृत आदी ग्रंथ व नामदेव, एकनाथ, रामदास, मुक्तेश्वर, मध्वमुनीश्वर, तुकाराम, तुलसीदास, कबीर आदी मराठी-हिंदी कवींच्या ग्रंथांचे लक्षपूर्वक परिशीलन. स्वतःच्या अध्ययनार्थ पंत हस्तलिखित ग्रंथ मागवून ते स्वतः वा अन्य कुणी नकलत. असे नकलून घेतलेले ९७ ग्रंथ (४१ संस्कृत, ५६ मराठी) आज उपलब्ध आहेत. पंत स्वतःस ग्रंथसंग्रहकारी विद्यार्थी म्हणवून घेत.

अध्ययनानंतर इ. स. १७५२ (श. १६७४) मध्ये मोरोपंत बारामतीस बाबुजी नाईक यांच्याकडे पुराणिक म्हणून आश्रयास आले. पुराण सांगितल्यावर उरलेल्या वेळात कविता करणे हा पंतांचा आवडता छंद होता. इ. स. १७५२ पासून १७९३ पर्यंत म्हणजे जवळजवळ ४१ वर्षे पंतांनी अव्याहत काव्यलेखन करून उदंड कविता लिहिली,

पन्हाळगडी मोरोपंतांचे अध्ययन चालू असतानाच त्यांचे वडील कोल्हापूरची नोकरी सोडून बारामतीस बाबूजी नाईक यांच्या आश्रयास आले. चोविसाव्या वर्षी मोरोपंतही त्यांच्या पदरी पुराणिक म्हणून राहिले. प्रतिवर्षी वेतन पाचशे रुपये. अल्पावधीत कीर्तनकार- प्रवचनकार म्हणून पंतांचा नावलौकिक बारामतीत पसरला. त्यांच्या आर्या कीर्तनकारांद्वारे महाराष्ट्रभर पोचल्या. कवी म्हणून त्यांना मान्यता लाभली. तरीही ते स्वतःस कविकिंकर म्हणत. त्यांना रघुनाथ, रामकृष्ण व काशीनाथ असे तीन पुत्र

व तीन मुली. त्यांच्या पत्नीचे नाव रमाबाई. राम हे त्यांचे आराध्य दैवत. उत्तरायुष्यात त्यांनी पुष्कळ यात्रा केल्या, हे त्या त्या ठिकाणच्या देवतांच्या स्तुतिपर रचनांवरून कळून येते. १७९४ साली ते काशीयात्रेहून परतले आणि हनुमानजयंतीच्या दिवशी त्यांचे देहावसान झाले.

मोरोपंतांच्या काव्यलेखनाचा आरंभ त्यांच्या वयाच्या बाविसाव्या-तेविसाव्या वर्षापासून सुरू झाला. आयुष्यभरात त्यांनी विपुल काव्यरचना केली. २६८ **काव्यकृती** त्यांच्या नावावर आहेत. त्यापैकी महत्त्वाच्या पुढीलप्रमाणे : आर्याभारत, केकावली, मंत्रभागवत, मंत्ररामायण, श्रीकृष्णविजय आणि हरिवंश. त्यांनी संस्कृत काव्यरचनाही केली आहे. त्यांचे समग्र वाङ्मय कविवर्य मोरोपंतांचे समग्र ग्रंथ: खंड १ ते १२ यामध्ये संग्रहित करण्यात आले आहे.

या ४१ वर्षांच्या कालावधीत पंतांनी 'समुद्राप्रमाणे विपुल अशी कविता लिहिली. त्यांच्या प्रकाशित (५७,०७५) आणि अप्रकाशित (४७,०७५) अशा एकूण काव्यसंग्रहाची संख्या एक लाखाच्या वर जाते. पुराणिकाचा व्यवसाय, भोवतालचे मित्रमंडळ आणि प्रदीर्घ व्यासंग यांमुळे पंतांची काव्यरचना संपन्न झाली. काव्य, नाटक, चंपू, भाण इ. चे वाचन; अलंकारशास्त्र, छंदशास्त्र, कोश इ. चे अध्ययन; ज्योतिष, पुराण, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांचे अवलोकन यांनी पंतांची प्रज्ञा संस्कारित झाली आहे. पंतांनी ज्ञानेश्वरांपासून रामजोश्यांपर्यंत सर्व मराठी संतांची व कवींची कविता काळजीपूर्वक वाचली होती; असे पंतांचे चरित्रकार ल. रा. पांगारकर यांनी नमूद केले आहेच. पूर्वीच्या मराठी कवींच्या किती तरी कल्पना व रचनापद्धती पंतांनी उचलल्या आणि आपले काव्य सजविले. पंतांचा कालखंड महाराष्ट्राच्या इतिहासातील मोठ्या धामधुमीचा कालखंड असूनही त्यांच्या कवितेवर त्याचा कुठे परिणाम झालेला आढळत नाही. भोवतालच्या जीवनातील स्थित्यंतरापासून लांब राहून पंत रामायण-महाभारतातील युद्धवर्णनातच अधिक रमले. 'शांत, धर्मनिष्ठ, कुटुंबवत्सल, कर्तव्यदक्ष, व्यवहारचतुर, असे गृहस्थ, व्यासंगी अभ्यासक, कलाभिज्ञ कवी, प्रभावशाली पुराणिक, खरेखुरे भगवद्भक्त असे पंतांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. पंतांची कविता त्यांच्या या गुणविशेषांना धरूनच वाढली असल्याने गांभीर्य, नेमस्तपणा, अभिजातता आणि रचनेचा नेटकेपणा हे विशेष तिच्यात आपोआप येत गेले.

### श्लोककेकावली :-

केकावलि, केकावलि' नावाची दोन स्फुट प्रकरणे मोरोपंतांनी रचलेली आहेत व त्यांत योजलेल्या वृत्तांवरून ती आर्यकेकावली आणि श्लोककेकावलि या नावांनी ओळखली जातात. आर्यकेकावली फारशी प्रसिद्ध नसल्यामुळे 'केकावलि' या सामान्य संज्ञेने 'श्लोककेकावलि' या काव्याचाच बोध होतो. मोरोपंतांनी 'आयकिकावलि' हे काव्य आपल्या ऐन उमेदीत म्हणजे पस्तीशीच्या सुमारास रचले पण श्लोककेकावलिची रचना साठी उलटून गेल्यानंतर झाली. सारे आयुष्य भगवद्भक्तीत घालवूनही अद्याप पूर्ण वासनाक्षय व पापक्षालन होऊन आपले अंतःकरण पूर्णतः शुद्ध झालेले नाही. अंतःकरणाची दुर्बळता, विषयांची पकड,

पापीपणाची जाणीव अशा आध्यात्मिक संकटांपासून आपली सुटका व्हावी म्हणून पंतांनी 'दयाघन' परमेश्वराला आर्तपणे विनविले आहे. 'श्लोककेकावलि' हे काव्य मोरोपंतांनी १७९३ मध्ये लिहिले असावे असे मानले जाते. **'श्लोककेकावलि' हे काव्य पृथ्वी वृत्तात** (गणः जसजस यल ग) रचलेले असून एकूण त्याची श्लोकरचनासंख्या १२२ एवढी आहे. उपसंहाराच्या शेवटच्या श्लोकात 'कारुण्यांभोद' राम हा 'मयूरा नराचा' प्रिय सखा आणि गुरू असल्यामुळे

'त्याचे साचे स्वभद्र स्मरण, मग न त्या ते कसे ये कवीस

केका, एका सख्या ते स्मरूनि, करि अशा येकसे येकवीस'

अशी श्लोकांची संख्या मोरोपंतांनीच खुद्द नोंदवून ठेवली आहे.

परमेश्वराने आपला उद्धार करावा या तळमळीतून त्याला करुणार्त रवाने आवाहन करणारे हे काव्य असले तरी ही विनवणी करणारा भक्त अतिशय चतुर आहे. ईश्वर स्तुतीला भुलतो हे जाणून त्याने विविध प्रकारे त्याची स्तुती केलेली आहेच. तो स्वामी, उदार दाता, ऐश्वर्यसंपन्न प्रभु, शरण्य, पतितांचा उद्धारक, दुष्टांचा संहर्ता आहे या प्रकारे स्तुती करूनही जर तो चटकन प्रसन्न होत नसेल तर त्याला शब्दांमध्ये अडकवून, वकिली डावपेच लढवून, किंवा कधी आळवून तर कधी हिणवून उद्धाराला भाग पाडले पाहिजे अशीही भूमिका भक्त घेतो. त्यामुळे मोरोपंतांचे हे काव्य वेगळाच बौद्धिक आनंद देणारेही झाले आहे.

'निजस्तुति तुम्हां रुचे, स्तविति त्या वरें तर्पितां,

नमस्कृतिपरां वरे स्वधन सर्वही अर्पितां;

स्वभाव तुमचा असा विदित जाहला याचकां;

करू स्तव जसातसा, फळ नव्हे जना याच का?'

परमेश्वर पतितांचा जर उद्धार करतो, तर मी पतित नाही काय ? की त्याची कृपाच सरली ? पण जगन्नाथाच्या कृपेला कुठे अंत असेल का, नाहीच, पण मग मी त्याला दिसलो नसेन काय? पण ज्याचे सूर्य, चंद्र हे दोन डोळे आहेत त्याला मी दिसलो नसेन हे शक्य तरी आहे काय? की त्याने माझ्याविषयी अंतःकरणात विषाद (द्वेष-राग) धरला आहे? पण हे तरी कसे शक्य आहे? कामधेनू किंवा गाय, दूधच विणार, ती कुठे विष प्रसवील काय? (श्लोक क्रमांक ४). यावरून मोरोपंतांच्या युक्तिवादचातुर्याची कल्पना येऊ शकते.

श्लोककेकावलिची रचना अत्यंत ठोस आणि भाषा अगदी घोटीव आहे. उपमा, उत्प्रेक्षा, श्लोक, दृष्टान्त यांची अगदी रेलचेल आहे. मोरोपंतांचे यमकप्रेम विख्यात आहे. त्यामुळे आणि काही ठिकाणी प्राचीन कथा, पुराणे यांच्यातील संदर्भाच्या विपुलतेमुळे काव्यात क्लिष्टताही आली आहे. मोरोपंतांची रचना तशी प्रासादिक क्वचित असते पण तरीही उत्कटता, आर्तता, तळमळ आणि मोरोपंतांच्या वृत्तीतील सहज प्रेमळभाव यांमुळे हे काव्य अति रसाळ व गोड वाटते.

पंतांची स्फुट रचना श्लोककेकावली हे पंतांचे जवळजवळ **अखेरचे काव्य** म्हटले पाहिजे. कृतान्त-कटकामल-ध्वज-जरा दिसों लागली पुरःसरगदांसवें झगडतां तनू भागली ।। अशा अवस्थेत पंतांनी या श्लोककेकावलीचे लेखन केले आहे. हे काव्य म्हणजे पंतांच्या 'वृत्तीचे आणि गुणांचे परिपक्व फळ होय.' रचनाचमत्कृती आणि भावोत्कटता या दोन्ही गुणांचा अनुभव श्लोककेकावलीमध्ये येतो. धिटाई, निर्भर्त्सना, विश्वास, समाधान इ. भक्तीच्या आविष्काराचे विविध तरंग, पंतांचे युक्तिवादचातुर्य, संवादकौशल्य अशी अनेक वैशिष्ट्ये येथे आढळतात.

पंतांनी ईश्वराशी केलेला वादविवाद, घेतलेल्या शंकाकुशंका त्यांनी स्वतःची इतर श्रेष्ठ भक्तांशी केलेली तुलना आणि पत्करलेली विनयशीलता यांत त्यांच्या कल्पकतेचा रम्य आविष्कार दिसतो. काही ठिकाणी मात्र उत्कटतेपेक्षा वावदुकताच अधिक आढळते. पौराणिक कथांचे संदर्भ तर यात असंख्य आहेत. पंत कुठे ईश्वरासमोर प्रियतमेच्या भूमिका स्वीकारतात, तर कधी त्याला आपली कवितारूपी कन्या दान करतात. देवाला आवाहन करताना, लक्ष्मीशी रममाण होणाऱ्या कृष्णाला पंतांनी जी हाक दिली आहे, तीत भक्तिभावापेक्षा शृंगारिकताच अधिक दिसते. यातील परमेश्वरस्तुती पौराणिक पद्धतीची नाही. तिच्यात 'अभिजात संस्कृताचे मनोहारित्व' आहे. पंतांच्या कल्पनाविलासाच्या आणि रचनाचार्तुर्याच्या असंख्य खुणा या केकांमध्ये आढळतात.

दयामृतघना अहो हरि ! वळा मयूराकडे ; रडे शिशु, तयासि घे कळवळोनि माता कडे,

असा अतिथि धार्मिक स्तुतपदा ! यदा सांपडे ? तुम्हां जड भवार्णवीं उतरितां न दासां पडे

ही स्वोद्धाराविषयी पंतांनी केलेली अखेरची प्रार्थना अत्यंत वेधक आहे.

सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो,
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो,
सदंघ्रिकमळीं दडो, मुरडिता हटाने अडो,
वियोग घडता रडो, मन भवच्चरित्रीं जडो

हा पंतांनी सांगितलेला सत्संगतीचा महिमा आजही समाजमनात रुजलेला असून समाजजीवनाला अप्रतिहत उद्बोधन करण्याचे सामर्थ्य त्यात आहे.

---

## २.२. पानिपतची बखर

**बखर**

खबर ( = वार्ता, समाचार, वृत्त) या अरबी शब्दाचा विपर्यास होऊन बखर शब्दाची निर्मिती झाली आहे.) बक = बकणे म्हणजे बोलणे या धातूपासून बखर शब्दाची निर्मिती झाली असावी, असे इतिहासाचार्य राजवाडे यांना वाटते. त्यावरून फार पूर्वीच्या काळी बखरी लिहिण्याऐवजी तोंडाने बोलल्या जात असाव्यात, असा तर्क करणे भाग पडते. पण बखरीची मूळ कल्पनाच परकीय असल्याने राजवाडे यांची वरील व्युत्पत्ती मान्य होणे कठीण आहे. बखर या शब्दाचा रूढ अर्थ राजकीय स्वरूपाचे ऐतिहासिक लेखन असा आहे. त्यामुळे गद्यात लिहिलेला' ऐतिह्य वृत्तांत ' अशी बखरींची ओळख करून देता येईल. मुसलमानांमध्ये तवारिखा लिहिण्याची पद्धत होती. म्हणून 'मुसलमानांच्या सहवासाने, त्यांच्या तवारिखा पाहून, मराठ्यांनीही बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला; ' असे राजवाडे म्हणतात, इतिहासाचार्यांचे हे विधानच त्यांच्या वरील व्युत्पत्तीच्या मूळावर घाव घालते. त्यामुळे ही व्युत्पत्ती विचारात घेण्याचे फारसे कारण उरत नाही.

ऐतिहासिक वृत्तकथनाच्या गरजेतून मराठी बखर वाङ्मयाची निर्मिती झाली. मराठ्यांच्या इतिहासातील निरनिराळया घटना-प्रसंगांवर जवळजवळ दोनअडीचशे बखरी लिहिल्या गेल्याचे राजवाडे सांगतात. इंग्रजी काळातही काही पौराणिक, मिशनरी चळवळविषयक, आणि ऐतिहासिक बखरी लिहिल्या गेल्या. रचनाकाळाच्या दृष्टीने महिकावतीची बखर ही सर्वांत जुनी बखर होय. बखरींचे स्थूलमानाने पाच वर्ग पड़तात, ते असेत-

**१ समकालीन बखरकाराने समक्ष पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या राजकीय घटनाप्रसंगांवर आधारित बखरी.**. या प्रकारच्या बखरींत समकालीन राजकारणाचा इतिहास असतो. ऐतिहासिक घटना डोळयापुढे घडल्याप्रमाणे बखरकार सारी माहिती सांगत असल्यामुळे ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने या बखरी बऱ्याचशा विश्वसनीय ठरतात. सभासदी बखर किंवा भाऊसाहेबांची बखर या बखरी या प्रकारात मोडतात. अशा समकालीनांनी लिहिलेल्या बखरी थोड्या आहेत.

**२ केवळ स्मृतीवर हवाला ठेवून, आठवणी, दंतकथा, आख्यायिका, पारंपरिक हकीगती यांच्या आधारे लिहिलेल्या उत्तरकालीन बखरी.** अशा उत्तरकाळी लिहिलेल्या बखरींत उपलब्ध पुराव्याची छाननी करण्यास आणि कथनपद्धती अधिक आकर्षक व कलात्मक करण्यास बखरकाराला संधी मिळते. पण त्याच वेळी उत्तरकाळी आणि तेही स्मृतीवर हवाला ठेवून या बखरी लिहिल्या असल्यामुळे त्यांत कालविपर्यास, व्यक्तिविपर्यास व स्थलविपर्यास होण्याची शक्यताही असते. कृ. वि. सोहनीविरचित पेशव्यांची बखर या प्रकारात येते.

**३ ऐतिहासिक कागदपत्रे, जुने ग्रंथ, दप्तरातील टिपणे यांच्या आधारे लिहिलेल्या उत्तरकालीन बखरी** ऐतिहासिक आधार घेऊन या बखरी लिहिल्या असल्यामुळे त्या उत्तरकालीन असल्या तरी ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने बऱ्याचशा विश्वसनीय असतात. मल्हार रामराव चिटणीसविरचित सप्तप्रकरणात्मक चरित्र या सदरात मोडते.

**४ प्रत्यक्ष बखर** हे नाव न दिले तरी बखरसदृश ऐतिहासिक स्वरूपाचे लेखन हा बखरींचा चौथा प्रकार म्हणता येईल, उदा. वाका, कैफियत, हकीगत, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी लेखन, पहिल्या वर्गाच्या बखरीतील 'आँखो देखी हकीगत' यांतही असते. पटवर्धनी वाका, आंग्यांची हकीगत, भाऊसाहेबाची कैफियत हे लेखन या वर्गात समाविष्ट होईल.

**५ ऐतिहासिक किंवा राजकीय विषय नसलेल्या परंतु बखर हे नाव असलेल्या बखरींचा हा पाचवा वर्ग होय.** या बखरी प्रामुख्याने पौराणिक व सांप्रदायिक स्वरूपाच्या असतात, हे लेखन श्रद्धामय असून केवळ धार्मिक भूमिकेने केलेले असते. चमत्काराच्या प्रसंगामुळे त्यात ऐतिहासिक सत्य अगदीच कमी असते. "चमत्कार अवताराच्या कल्पना, आदर्श जीवन यांनीच त्यांचा देह घडलेला असतो.' उदा. समर्थांची बखर, कृष्णजन्मकथा बखर, बकासुराची बखर इत्यादी.

**बहुतेक सर्व बखरींचे लेखन गद्यातूनच झालेले आढळते. गद्यपद्यमिश्रित अशी महिकावतीची बखर** हाच काय तो एक अपवाद. गद्यात्मक मजकूर पद्यापेक्षा अधिक निश्चित स्वरूपाचा असल्याने बखरकारांनी हे गद्यात्मक माध्यम बखरलेखनासाठी निवडले असावे. कोणा तरी राजकीय पुरुषांच्या आज्ञेनुसार या बखरींचे लेखन झाले. बहुतेक बखरकार हे सरकारदरबारचे आश्रित किंवा कारकूनपेशातील असल्याकारणाने बखरलेखनाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. इतर सर्व वाङ्मयप्रकारांपेक्षा बखररचनेचे स्वरूप बरेचसे वेगळे आहे. बखरींचा प्रारंभ असतो पुराणपद्धतीचा, आणि शेवट असतो फलश्रुतिमय. सृष्टीची उत्पत्ती, राजांच्या वंशावळी इत्यादी गोष्टी बखरीच्या प्रारंभी देऊन नंतर तो वृत्तकथन करतो. सप्तप्रकरणात्मक चरित्राच्या पहिल्या प्रकरणातील पूर्वजवर्णन याच स्वरूपाचे आहे. याच चरित्राच्या शेवटी मल्हार रामराव चिटणीस 'हे कथा श्रवण, मनन, पठण केली असतां सर्व विघ्ने दूर होऊन पुण्य व यश प्राप्त होईल आणि सर्वगुणसंपन्नता प्राप्त होऊन सकलऐश्वर्यलक्ष्मी तत्काळ प्राप्त होईल;' अशी फलश्रुती सांगतात. पुराणग्रंथांचे वाचन, धार्मिकता व श्रद्धात्मकता यांचा पगडा आणि बालबोध वळण या बखरकारावरील संस्कारांतून बखरींचे हे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप जन्माला आले आहे.

**बखर : एक वाङ्मयप्रकार**

विषय आणि लेखनाची पद्धती यामुळे बखरीस एका स्वतंत्र वाङ्मयप्रकाराचे मूल्य प्राप्त झाले आहे. बखरकार हा कलावंत आहे. त्याला बखर नुसती लिहाव्याची नाही, तर ती ' सजवावयाची' आहे. रघुनाथ यादव पानिपतच्या बखरीच्या शेवटी' यथामतीने बखर सजवून सेवेशी पाठविली आहे,' असे म्हणतो. बखर

सजविणे या शब्दप्रयोगातूनच त्याची सौंदर्यदृष्टी स्पष्ट होते. बखरकार हा कथनकार आहे. प्रत्यक्ष पाहिलेल्या आणि ऐकलेल्या प्रसंगांच्या आणि व्यक्तींच्या वर्णनाशी तो एकरूप होतो, त्यात आपल्या कल्पनांचे रंग भर्ती) हे रंग इतके गहिरे असतात की, तो प्रसंग आणि ती व्यक्ती आपल्यापुढे साक्षात उभी राहते. त्यांच्या एकरूपतेमुळे कोरडे तपशीलही जिवंत होऊन बोलू लागतात. आणि त्यातील भावनेची विलक्षण उत्कटता वाचकांच्या मनाला भिडते.

बखरकारांच्या निवेदनाला रंग, रूप आणि आकार प्राप्त होऊन त्यांतून सुंदर वाङ्मयीन मूर्ती निर्माण होते भाऊसाहेबांच्या बखरीत असे जिवंत आणि नाट्यपूर्ण प्रसंग किती तरी आढळतात. वीर आणि कारुण्याचा प्रत्यय सतत देणाऱ्या या बखरी म्हणजे प्राचीन मराठी' गद्य सारस्वताचा एक स्वतंत्र विलास' आहे. बखरीतील व्यक्ती व प्रसंगनिर्मितीमागे बखरनवीसाचे व्यक्तिमत्त्व उभे असते. बालबोध वळण, रामायण-महाभारतादी पुराणग्रंथांचे श्रवणपठण, फारसी-उर्दूचे अध्ययन, सरकारदरबारी वावरल्यामुळे अनुभविलेले, रीतिरिवाज आणि प्राप्त झालेली बहुश्रुतता या संस्कारांनी त्याचे व्यक्तिमत्त्व संपन्न झाले आहे. कल्पकता, सूक्ष्म निरीक्षण आणि निवेदनकौशल्य या गुणवैशिष्ट्यांची त्याला जोड मिळते. त्यामुळे त्याचे निवेदन कलात्मक बनते. कधी कधी ते हरदासी थाटाचेही बनते. त्यात त्याच्या या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कारही होत जातो आणि म्हणून कित्येक ठिकाणी त्याला आपोआपच आत्माविष्कारासारखी उत्कटता येते. असे 'भावनापूर्ण लेखन हे बखरींच्या यशाचे अमोघ साधन' म्हटले पाहिजे.

वरील साऱ्या वैशिष्ट्यांना व्यक्ती आणि प्रसंगानुरूप असणारी जिवंत व रसरशीत भाषा, अलंकृती, कल्पनारम्यता, सुभाषिते, म्हणी यांचा वापर, पौराणिक संदर्भ, दाखले यांनी युक्त असलेल्या बखरकाराच्या शैलीची जोड मिळालेली पाहिली की, बखरकार हा कलावंत आहे, असे निश्चितपणे वाटते) ' बखरकार हा जाणीवपूर्वक कलानिर्मिती करणारा कलावंत नव्हे. परंतु बखरींच्या एकंदर घाटावरून व त्यावर चढलेल्या कल्पनेच्या व भावनात्मकतेच्या रंगावरून बखरकार हा एक Unconscious artist आहे, असे अनुमान केले, तर ते वावगे होणार नाही;' हे गं. ब. ग्रामोपाध्ये ' यांचे विधान बखरकारामधील कलावंताचा नेमका शोध घेणारे आहे.

**पेशवेकालीन बखरी**

'शिवकालीन बखरींच्या तुलनेने पेशवेकालीन बखरींतील विषयांच्या स्वरूपात विविधता आली आहे. शिवाजीच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या परिणामातून जशा अनेक बखरी निर्माण झाल्या तशाच बखरी पानिपतचा रणसंग्राम या महनीय घटनेच्या परिणामातून निर्माण झाल्या. प्रसंगात्मक, चरित्रात्मक, आत्मचरित्रपर, काही घराण्यांच्या हकीगती अशी विषयांची व प्रकारांची विविधता त्यात आढळते. याशिवाय काही सांप्रदायिक स्वरूपाच्या बखरींचेही लेखन या सुमारास होऊ लागले.

पानिपतचा रणसंग्राम हे मराठ्यांच्या इतिहासातील एक स्वतंत्र पर्व आहे. या युद्धात मराठ्यांचा पराभव झाला असला, तरी त्यांच्या ठिकाणच्या क्षात्रतेजाने सारे भारतवर्ष दिपून गेले. पराभवही अभिमानास्पद ठरावा असे हे पर्व ! या पर्वातील ओज, उग्रभीषण जीवननाट्य आणि त्यातून जन्माला आलेले कारुण्य यांनी मराठी राज्यसत्तेलाच नव्हे, तर तत्कालीन मराठी मनालाच काही वेगळे वळण लावले. अनेक विचारांचे आणि भावनांचे स्फुल्लिंग निर्माण करणाऱ्या मराठ्यांच्या या महाभारतावर अधिक संख्येने बखरी लिहिल्या जाव्यात, हे स्वाभाविकच होते. पाणिपतची बखर, भाऊसाहेबांची कैफियत, होळकरांची थैली, काशीराजाची बखर, नाना फडणिसाचे आत्मचरित्र या सर्व बखरीतून पानिपतच्या युद्धाची समग्र आणि सविस्तर हकिगत सांगण्याचाच हेतू स्पष्ट दिसतो. भाऊसाहेबांची बखर ही तर या सर्व बखरींचा मुकुटमणी म्हटली पाहिजे.

**पाणिपतची बखर**

'श्रीमंत महाराज मातोश्री गोपिका- बाईसाहेब मुकाम पुणे' यांच्या आज्ञेवरून रघुनाथ यादव चित्रे यांनी ही बखर रचली. तिचा लेखनकाल अंदाजे अठराव्या शतकाच्या सातव्या दशकाचा असावा. 'केवळ परशुराम अवतार', 'कल्पांतीचा आदित्य' असा सदाशिवरावभाऊ प्रस्तुत बखरीचा नायक. शिंदे-होळकरांच्या जिकरीच्या स्पष्टोक्तीला निश्चयी उत्तर देणारा, 'रावसाहेब, तुम्हांस मी मरणाचे दारीं आणले!' म्हणून विश्वासरावांसमोर सद्गदीत होणारा, त्याला गोळी लागताच दुःखावेगाने शोक करणारा, समय बाका गुदरल्यास आपल्या कुटुंबाचा शिरच्छेद करा पण त्यांना म्लेंच्छ शत्रूच्या हाती लागू देऊ नका म्हणून विनवणी करणारा भाऊसाहेबांची ही विविध रूपे बखरकार ठसठशीतपणे सजीव करतो, मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे, विश्वासराव यांची स्वभावचित्रेही रेखीवपणे रेखाटतो. 'एकच रणधुमाळी दोन्ही सैन्यात माजली. धुरेंकरून दिनमणीचा अस्त जाहाला असा भास जाहाला. घे घे हीच गर्जना उठली... रक्तोदकाचे पाट रणभूमीस वाहूं लागले. बीभत्स शरीरें दिसों लागली' यासारखी युद्धवर्णने करण्यात बखरकार वाकबगार आहे.

ही वर्णने करताना त्याला वेळोवेळी महाभारत-रामायण यातले प्रसंग आठवू लागतात. ते तत्सदृश तत्कालीन प्रसंगांच्या संदर्भात नोंद करतो. रघुनाथ यादवांच्या निवेदनामधून, बखर-वाङ्मयाचे गाढे अभ्यासक ग्रामोपाध्ये म्हणतात त्याप्रमाणे, 'मराठ्यांचे शौर्य, धारिष्ट्य, दृढनिश्चय, राजनिष्ठा इत्यादी गुण व्यक्त होतातच. पण शिवाय उदात्त चरिताच्या हट्टापायी सर्वनाश कसा ओढवतो याचे हृदयद्रावक चित्रही उभे राहते. पानिपत ही मराठ्यांच्या इतिहासातील एक शोककथा आहे आणि या शोककथेचा शोकात्म प्रत्यय प्रस्तुत बखरीत मिळतो हेच तिचे यश.'

पानिपतच्या युद्धानंतर अवघ्या दोन वर्षांच्या आत ही बखर लिहिली गेली असल्यामुळे समकालीन बखर म्हणून तिला ऐतिहासिक महत्त्व आहे. गोपिकाबाईच्या आज्ञेवरून रघुनाथ यादव चित्रगुप्त याने ही

बखर लिहिली असून युद्धाचे वेळी तो हजर होता. एक बारनीस शत्रूकडील व श्रीमंतांकडील या उभयतांच्या दिनचर्येचे वर्तमान दफात्यास चिटणिसांनी बार केली त्यांची संगत पाहून, कच्चा मजकूर सेवेशीं निवेदन करावयांकरिता यथामतीने बखर सजवून सेवेशी पाठविली आहे; असा उल्लेख त्याने बखरीच्या शेवटी केला आहे. तरीही जाटाने भाऊसाहेबास विश्वास दाखवून 'इराणीसुद्धा भारी फोजेनिशी एकाएकी दिल्लीस आणिले,' अबदल्लीच्या पुत्राचे नाव तेजूरशहा (वास्तविक तैमूरशहा असे हवे, पानिपतच्या लढाईची तीथ मंगळवार पौष शु. २ ( वास्तविक बुधवार पौष शु. ८ अशी हवी) ही रघुनाथ यादवाने या बखरीत दिलेली माहिती इतर ऐतिहासिक साधनांशी जुळणारी नाही. दत्ताजी शिंद्यांचा उल्लेख या बखरीत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. अशा व्यक्ती-काळविषयक ऐतिहासिक विसंगतीमुळेच सर यदुनाथ सरकारांनी या बखरीस 'अफूबाजाने लिहिलेली गोष्ट,' असे म्हटले असावे. पानिपतच्या बखरीचे संपादक र. वि. हेरवाडकर मात्र 'तत्कालीन माहितगार व्यक्तीने ही पानिपतची बखर लिहिली असल्याने काही चुका गाळल्या असता ती विश्वसनीय मानणे योग्य ठरेल; असे म्हणतात. आकर्षक वर्णनपद्धती हे पानिपतच्या बखरीचे महत्त्वपूर्ण अंग. ऐतिहासिक व्यक्ती आणि

घटना यांच्याबद्दल विलक्षण आपुलकी, जिव्हाळा, वर्ण्यविषयाशी तादात्म्य आणि पक्षनिष्ठा यांमुळे तीमधील व्यक्तिवर्णनात, प्रसंगवर्णनात जिवंतपणा उतरला आहे उदा. 'हवद्यास हवदे, राउतास राऊत, एकमेळ जाहाला, व सुतरनाले बाणांच्या कैच्या व करोलाच्या गोळया व गरनाळा व तोफांचा मारा एकांच जाहाला. एकच रणधुमाळी दोन्ही सैन्यांत माजली धुरेंकरून दिनमणीचा अस्त जाहाला असा भास पडला. घे घे हीच गर्जना उठली. उमास घ्यावयास अवकाश पडेना. पुढचा पाय पुढे, कोणास कोणी हरेना' हे युद्धास तोंड लागल्यानंतरचे वर्णन, आणि, 'तीन चार तासापर्यंत एकच घाई शस्त्रसंधानाची जाहाली. मुर्ध्यावर मुर्दे पडू लागले. वीरांच्या नजरा फिरोन गेल्या. आपपर कोणी ओळखेनासे जाहाले. वीर रणामध्ये माजले. रणमद चढला. खाशाखाशांचे हौदे एकास एक लागून जोरावारीने लढों लागले. केवळ दशाग्नी शताग्नीशी मारू लागले. ते समयी सदाशिवपंत यांनी अंबारीतून उतरून दोहों हाती पट्टे घेऊन, नीट फौजेत चालून घेतले. तेव्हा नामी सरदार व धारकरी नावबिनावांचे यांणी जीवित्वाची तमा न धरितां बेलाशक हैदोसच केला, कोणास क्षतें वर्मी लागली ते विष्णुलोकास गेले व कोणी रणांगणी मूच्छित पडले व कोणाची शिरे तुटोन धडावेगळी जाहाली व कोणाची उदरें फुटोन अंतरमाळा लोंबू लागल्या परंतु अणुमात्र कोणी लढाईविषयी कसर केली नाही.'

लढाईची एकच गर्दी झाल्यानंतरचे हे वर्णन सूक्ष्म, वीररसपूर्ण आणि परिणामकारक असे आहे. प्रसंगवर्णनाप्रमाणेच या बखरीतील व्यक्तिवर्णनेही जिवंत आहेत. भाऊसाहेब, विश्वासराव, जनकोजी शिंदे ही व्यक्तिदर्शने त्यांच्या विचारामुळे आणि जिवंत वक्तव्यामुळे स्मरणात राहतात. 'पुरुषात देखणा विश्वासराव साहेब किंवा बायकांत देखणी मस्तानी बाईसाहेब, समशेर बहादूर यांची मातोश्री, अशी दोन

माणसे दक्षिणेत स्वरूपाचे जाहाली;' या वाक्यातून व्यक्त होणारे विश्वासरावाचे वर्णन त्रोटक पण ठाशीव आहे. आज्ञेनुसार या बखरीचे लेखन झाले असल्यामुळे काही ठिकाणी पक्षनिष्ठा आणि गौरवही आला आहे. पण तो गौरवही सार्थ आहे.

सदाशिवरावभाऊंनी युद्धात गाजविलेल्या पराक्रमाविषयी बखरकार म्हणतो ' या मागे या कलयुगीं असा योद्धा कोणी जाहाला नाही. पुढेही होणे जरूर ( = विरळा). भारती युद्धासमान सदाशिवपंतांनी युद्ध केलें. या कलियुगीं मानव जातीत ब्राम्हणकुळात जन्म घेऊन पराक्रम थोर केला. धन्य त्यांची जननी कीं असा पुत्र प्रसवली ! येणे करून सप्तपुरुष उद्धरून विष्णुलोकास गेले. धन्य त्या पुरुषाचा पिता त्यास साम्यता दशरथाची किंवा पंडूची ! चिमाजी आपाची धन्य की हा पुत्र रामाप्रमाणे निर्माण जाहाला ! हे युद्ध पाहून स्वर्गी इंद्र व देवगण व गंधर्व स्तुती करू लागले की मानवी होऊन, जातीचा विप्र असतां प्रताप कर्णाप्रमाणे केला ! केवळ राम- रावण यांच्या युद्धासमान युद्ध जाहाले.' अशा गौरवपूर्ण उदात्त लेखनावरून बखरकाराच्या व्यक्तिदर्शनकौशल्याची आणि निवेदनाच्या पौराणिक धाटणीचीही कल्पना येईल.

रघुनाथ यादवाची वर्ण्यविषयाशी एकरूप होण्याची ताकद पाहिली की, भाऊसाहेबांच्या बखरीचा लेखक कृष्णाजी शामराव याची आठवण होते. या दृष्टीने रघुनाथ यादवाने लिहिलेला पुढील कारुण्यपूर्ण परिच्छेद लक्षणीय आहे. या युद्धकांडाच्या अंतसमयी हतबल झालेल्या मराठी सैनिकांची अवस्था तो वर्णन करतो, 'कितीएक हातापायांनी अधु जाहाले आणि भाऊबंद लढाईत गर्क जाहाले, आता देशी काय जावे, या कारणास्तव गंगाप्रवाही व यमुनाप्रवाही कितीएकांनी घालून घेतले. कितीएकांनी राज्यलोभे प्रयागी जाऊन करवत घेतले. कितीएक आभर जाहले. कितीक दरिद्री जाहाले ते पत्री कोठवर लिहावे ?' अशी कारुण्यपूर्णता आणि वर्ण्यविषयाशी एकरूपता यांमुळे काही प्रसंग मनात घर करून राहतात.

भाषासौंदर्याने आणि कल्पनासौंदर्याने तर ही बखर अंतर्बाह्य नटली आहे. 'त्या समयी भाऊ कसा भासला की, केवळ कल्पांतींचा आदित्य.',' हजारो हजार त्या कुरुक्षेत्री रणमंचकी निजलेच राहिले', 'रक्तोदकें भूलिंगास अभिषेक जाहाला आणि शिरकमले हीच भूलिंगास कमले अपर्ण जाहली;' अशा पौराणिक संदर्भयुक्त उपमा-दृष्टांतांनी बखरीचे वाङ्मयीन सौंदर्य घडले गेले आहे. प्रसंगांची उदात्तता आणि भाषेतील आवेश यांच्या कलात्मक साहचर्यामुळे या सौंदर्यात भरच पडली आहे. 'अप्रतिम वर्णनशैली, उत्कृष्ट कल्पकता, अलंकारांची समर्पक योजना, भाषाप्रभुत्व इत्यादी गुणांमुळे प्रस्तुत बखर वाङ्मय दृष्ट्या सरस झुसल्याचे र. वि. हेरवाडकर यांनी सांगितले आहे. ईश्वरनिष्ठा व स्वामिनिष्ठा हे रघुनाथ यादवाच्यों व्यक्तिमत्त्वाचे विशेष या बखरीत पुरेपूर जाणवतात.

रेखीव रचना, कल्पनाचातुर्य, निवेदनकौशल्य ही त्याची वैशिष्टचे. व्यक्तिदर्शन, वर्णनपद्धती, रसपरिपोष आणि भाषाशैली या वाङ्मयीन गुणवैशिष्ट्यांकडे लक्ष ठेवून लेखन केल्यामुळे हे ऐतिहय वृत्तकथन आकर्षक आणि मनोरंजक झाले आहे. प्रौढ व रसाळ भाषा; संस्कृत आणि फारसीप्राचुर्य, पौराणिक

दाखले; अलंकार, सुभाषिते, वाक्प्रचार म्हणी यांचा वापर; दंतकथा, आख्यायिकांचा आश्रय; सैन्य, कोट, दुर्ग यांची जमाखर्चपद्धतीने दिलेली माहिती; कधी व्यक्तिदर्शन व प्रसंगनिर्मितीसाठी लहान सुटसुटीत वाक्ये, तर कधी तपशीलवार निवेदनासाठी येणारी लांबलचक शिथिल वाक्यरचना; निवेदनात कधी आटोपाशीरपणा, तर कधी हरदासी थाट, असे या लेखनशैलीचे स्वरूप आहे. 'बखरीतील भाषा ही साधी, गद्य, नीरस, नुसतीच निर्जीव वर्णन करणारी ललितेतर साहित्याची भाषा नाही, तर जिवंत, रसरशीत आणि मनोहर अंशा वाङ्मयमूर्तीचे दर्शन देणारी ललित वाङ्मयाची भाषा आहे. मराठी गद्याला डौलदार, घाटदार, ऐटबाज, भारदस्त, प्रौढ, संस्कृत-फारसीप्रचुर, नाट्यपूर्ण स्वरूप प्राप्त करून देण्याचे श्रेय बखरी आणि बखरनवीस यांचे आहे.

------------------------------------------------

डॉ. संजय शिंदे
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय,राजगुरुनगर